सर्वोच्च न्यायालयाच्या “हरीश राणा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर” (M.A. No. २२३८ /२०२५ in SLP (C) No. १८२२५/२०२४) खटल्यातील आदेशाच्या अनुषंगाने खाजगी रुग्णालयांमध्ये Living Will संदर्भातील प्रकरणे हाताळण्यासाठीची प्राथमिक वैद्यकीय मंडळ व दुय्यम वैद्यकीय मंडळ यांची रचना निश्चित करणे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः न्यायप्र-२०२६/प्र.क्र.१६९/E-१७३६५२५/रुशआ-२
गो.ते. रुग्णालय संकुल इमारत, १० मजला,
मंत्रालय, एल.टी. मार्ग, मुंबई
दिनांक: १७ जुलै, २०२६

वाचा :-

१) सर्वोच्च न्यायालयाच्या “हरीश राणा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर” (M.A. No. २२३८ /२०२५ in SLP (C) No. १८२२५/२०२४) प्रकरणी दिलेले आदेश.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णयक्र. न्यायप्र-२०२३/प्र.क्र.२४०/समन्वय-२, दिनांक २९.११.२०२४

प्रस्तावना:

श्री. हरीश राणा मागील १३ वर्षांपासून अत्यंत वेदनादायी व गंभीर आजारी अवस्थेत होते, जिथे ते स्वतःची कोणतीही भावना किंवा वेदना व्यक्त करू शकत नव्हते. माननीय सर्वोच्च न्यायालयाने ११ मार्च २०२६ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निकालात, रुग्णाची गंभीर स्थिती लक्षात घेऊन त्यांचे कृत्रिम अन्न, पाणी व औषधोपचार (CANH/Life Support) थांबवण्यास मंजुरी दिली होती.न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांना एम्स (AIIMS), दिल्ली येथे दाखल करण्यात आले, जिथे २४ मार्च २०२६ रोजी त्यांचे शांततेत व सद्यास्थितीत सन्मानपूर्वक निधन झाले. सदर प्रकरणी माननीय न्यायालयाने “कॉमन कॉज” खटल्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचा दाखला देत,असे निर्देश दिले आहेत की, जेव्हा एखादा रुग्ण गंभीर परिस्थितीत असतो आणि त्याच्या “लिव्हिंग विल” (Advance directives) नुसार उपचार थांबविण्याची वेळ येते तेव्हा प्राथमिक वैद्यकीय मंडळ व दुय्यम वैद्यकीय मंडळांची मंजुरी आवश्यक आहे. उपरोक्त प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शासकीय निमशासकीय व खाजगी रुग्णालयांसाठी एकत्रित प्राथामिक व द्वितीय वैद्यकीय मंडळाची रचना निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>-

सर्वोच्च न्यायालयाच्या “हरीश राणा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर” (M.A. No. २२३८ /२०२५ in SLP (C) No. १८२२५/२०२४) खटल्यातील आदेशान्वये जेव्हा एखादा रुग्ण गंभीर परिस्थितीत असतो आणि त्याच्या “लिव्हिंग विल” (Advance directives) नुसार उपचार थांबविण्याची वेळ येते तेव्हा सदर प्रकरणी माननीय न्यायालयाने “कॉमन कॉज” खटल्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचा दाखला देत,असे निर्देश दिले आहेत की अशा प्रकरणी निर्णय घेण्यासाठी प्राथमिक वैद्यकीय मंडळ व दुय्यम वैद्यकीय मंडळ स्थापन करणे आवश्यक आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दिनांक २९.११.२०२४ अन्वये शासकीय रुग्णालयांमध्ये सदर प्रकरणी पुढीलप्रमाणे मंडळांची रचना करण्यात आली आहे.

प्राथमिक वैद्यकीय मंडळ / समिती	
अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक	अध्यक्ष
वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ (बधिरीकरण)	सदस्य
वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ (शल्य चिकित्सक)	सदस्य
वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ (भिषक)	सदस्य सचिव

द्वितीय वैद्यकीय मंडळ / समिती	
जिल्हा शल्य चिकित्सक	अध्यक्ष
वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ (बधिरीकरण)	सदस्य
वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ (शल्य चिकित्सक)	सदस्य
वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ (भिषक)	सदस्य सचिव

२. उपरोक्त खटल्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने खाजगी रुग्णालयांमधील “लिव्हिंग विल” संबंधि प्रकरणे हाताळण्यासाठी पुढीलप्रमाणे प्राथमिक व दुय्यम वैद्यकीय मंडळांची रचना निश्चित करण्यात येत आहे.

<u>प्राथमिक वैद्यकीय मंडळ / समिती</u> :

याबाबतची रचना रुग्ण दाखल असलेल्या खाजगी रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) / वैद्यकीय अधीक्षक यांच्याद्वारे केली जाईल.

प्राथमिक वैद्यकीय मंडळ / समिती	
संबंधीत रुग्णालयाचे रुग्णालयाचे प्रशासक	अध्यक्ष
उपचार करणारे वैद्यकीय तज्ञ	सदस्य
गंभीर आजार उपचार तज्ञ (Critical Care Specialist	सदस्य
वरिष्ठ फिजिशियन किंवा सर्जन	सदस्य

<u>द्वितीय वैद्यकीय मंडळ / समिती :-</u>

याबाबतची रचना रुग्ण दाखल असलेल्या खाजगी रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याद्वारे केली जाईल. मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळुन उर्वरीत जिल्हयांसाठी सदरची समिती राहील. मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयामध्ये वैद्यकीय अधीक्षक, जे.जे. रुग्णालय हे सदर समितीचे सदस्य राहतील.

द्वितीय वैद्यकीय मंडळ / समिती	
संबंधीत रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक	अध्यक्ष
उपचार करणारे वैद्यकीय तज्ञ	सदस्य
संबंधीत विषयातील तज्ञ - २ (५ वर्षांपेक्षा जास्त अनुभव)	सदस्य
जिल्हा शल्यचिकित्सक यांनी नामनिर्देशित केलेले सूचीबद्ध बाह्य विशेषज्ञ	सदस्य
जिल्हा शल्यचिकित्सक	सदस्य

३. द्वितीय वैद्यकीय मंडळावर विशेज्ञ नामनिर्देशित करण्याच्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक यांनी संबंधित जिल्ह्यातील नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांचे पॅनेल तयार करावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१७१२१४४५३९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ARVIND BHIMRAO MORE

Digitally signed by ARVIND BHIMRAO MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=203AF2DFBA7DB2A4824298A34F2C9294F93396F53D7F87CD4D69FECF5CF7005F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9246B8CCD2E2CB10707678D45EA1AD26CC1E4D7BFF7BD2AA1F253A716B8C448B, cn=ARVIND BHIMRAO MORE
Date: 2026.07.17 12:21:51 +05'30'

(अ.भि.मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
४. सह संचालक, (रुग्णालये-राज्यस्तर), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
५. उपसंचालक(सर्व), आरोग्य सेवा परिमंडळ
६. जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय (सर्व),
२/-यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णय आपल्या जिल्ह्यतील सर्व खाजगी रुग्णालयांच्या निदर्शनास आणावे.

७. उप संचालक, माहिती व जनसंपर्क, पुणे
८. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
९. निवड नस्ती.